P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

# प्रेसनोट दिनांक - १६/११/२०२३

## दि.१५/११/२०२३ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | देहूरोड ६१४/२०२३ भादवि कलम ३०२ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१४/११/२०२३ रोजी २०/३० वा. ते २२/०० वा. चे दरम्यान, त्याचे राहते घरी आय सी आय सी आय एटीएम च्या पाठीमागे, अगरवाल यांची चाळ, मामुर्डी गाव, देहुरोड, ता. हवेली जि. पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.१५/११/२०२३ रोजी ०२.३० वा |
| फिर्यादी | :- | मोमीन सुलेमान शेख, वय - २७ वर्षे, पोशि/३४३७, नेमणुक देहुरोड पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड, रा. साईनाथनगर, निगडी, |
| आरोपी | :- | निळकंठ अश्रुबा शिंदे, वय ४१ वर्षे, रा. आय सी आय सी आय एटीएम च्या पाठीमागे, अगरवाल यांची चाळ, मामुर्डी गाव, देहुरोड, ता. हवेली जि. पुणे **आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी याने त्याचे राहते घरी त्याची आई कांताबाई अश्रुबा शिंदे, वय -६० वर्षे हिस राहते घरी कौटूंबिक कारणावरुन चौकोणी आकाराचा लांब लाकडी वासा तिच्या डोक्यात मारुन जबर जखमी करुन तिला जिवे ठार मारले आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि जाधव ८१०८८५६५६५ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिखली ७४०/२०२३ भादविक ३९५,३९७, ५०४,५०६,४२७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१४.११.२०२३ रोजी २०.२० वाजण्याचे सुमारास घरकुल मधील भाजी मंडई जवळ, घरकुल,चिखली पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दिनांक दि.१५.११.२०२३ रोजी ०२.३७ वा |
| फिर्यादी | :- | अभिषेक मुकेश कांबळे,वय-२४ रा.फलॅट नंबर ७,बिल्डींग नंबर ७,अमृता हौसींग सोसायटी,अंजठा नगर,चिंचवड,पुणे |
| आरोपी | :- | १)मन्या कोरी, २)अतुल निसर्गंध, ३)जुनेद नायकोडी, ४)आकाश मस्के, ५)बंडु महाकाल, ६)सोहेल पठाण, ७)हतोडया भोसले सर्व रा.घरकुल,चिखली व पुणे व त्यांचे इतर अनोळखी मित्र |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व साक्षीदार असे मोटार सायकलवरुन घरकुलमध्ये चायनिज टपरीसाठी जागा बघालया गेले होते.फिर्यादी व साक्षीदार असे पुन्हा अंजठानगरला जाण्यासाठी निघाले असताना घरकुलमधील भाजी मंडईजवळ आरोपी क्रं १ याने फिर्यादी यांची मोटार सायकल अडवुन शिव्या दिल्या व ‘‘मी घरकुलचा भाई आहे,तुम्ही मला ओळखत नाही का,दारु प्यायला पैसे दया’’ असे म्हणाला.आरोपी क्रं २ याने त्याचे हातामधील फटाक्याची पेटती माळ फिर्यादीचे अंगावर टाकली.तसेच घरकुलमधील राहणारे आरोपी क्रं ३ ते ७ व त्यांचे सोबत अनोळखी मुलांनी फिर्यादी व साक्षीदार यांना हाताबुक्कयाने मारहाण केली.आरोपी यांनी साक्षीदार याचे मोटार सायकलचे खोपडीवर दगड मारुन खोपडी व हेडलाईट फोडुन नुकसान केले.आरोपी क्रं ५ याने दारु पिण्यासाठी पैशाची मागणी करुन आरोपी क्रं ५ व ६ यांनी फिर्यादी यांना पकडुन आरोपी क्रं १ याने फिर्यादीचे पँटचे खिशामधील १,०००/- रुपये जबरदस्तीने काढुन घेतले,फिर्यादी याने त्यांना विरोध करीत असताना आरोपी क्रं १ याने सिमेंटचा ब्लॉक फिर्यादीचे डोक्यात मारुन,आरोपी क्रं ४ याने त्याचे हातामधील चाकु फिर्यादीचे उजव्या हाताचे पंजावर मारला.फिर्यादी त्याचा जीव वाचविण्यासाठी शेजारी असलेल्या बिल्डींगमध्ये जीना चढुन तिस-या मजल्यावर गेला असताना आरोपी यांनी फिर्यादीचा पाठलाग करुन त्यास वरांडयामध्ये अडवुन पुन्हा हाताबुक्कयाने मारहाण केली.आरोपी क्रं ३ याने बांबुने आरोपी क्रं ५ याने बेल्टने व इतर आरोपी यांनी सिमेंटचे ब्लॉक व दगड मारुन फिर्यादी यास गंभीर जखमी केले आहे.तसेच आरोपी क्रं १ याने ‘‘आम्ही बॉण्ड टोळीचे आहोत,आक्या बॉड जेलमध्ये गेला,मी गँगचा लिडर आहे,बॉण्ड गँग माझी आहे,मी घरकुलचा भाई |

| | | |
|---|---|---|
| | | आहे,तुला कोणाला सांगायचे ते सांग,मी कोणाच्या बापाला भीत नाही,परत घरकुलमध्ये आला तर तुझी गेम करतो"असे बोलुन दमदाटी करुन जीवे मारण्याची धमकी देवुन फिर्यादी यास गंभीर जखमी केले म्हणुन. |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | विवेक कुमटकर,पोलीस उपनिरीक्षक, ९५५२५३६४३२ |

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | सांगवी ५९०/२०२३,भा.द.वि.कलम ३२६,३२३, ५०४,१४३, १४७, १४८, १४९,महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१)(३) सह १३५ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१५/११/२०२३ रोजी रात्रौ १२/३० वा चे दरम्यान बालाजी लॉन्सदत्त आश्रम कडे जाणा-या रोडवरजुनी सांगवी, |
| गुन्हा दाखल | :- | दि.१५/११/२०२३ रोजी १०/५४ वा |
| फिर्यादी | :- | रोहन हरीप्रसाद जैसी वय ४४ वर्षे धंदा- (इगल आय इंडस्ट्रीयल सर्व्हिसेस) सेक्युरीटी एजेन्सी रा. छत्रपती बॅके शेजारी रो हाऊसनं. ११ विशाल नगर पिंपळे निलख |
| आरोपी | :- | १) विरेंद्र विजय राणा २)सुशील रामचंद्र पाटील ३)सुनिल धोत्रे ४)सचिन ऊर्फ नाना पळसकर ५) रुपेश आतीक |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचा मित्र कृष्णा अनिल कारंजकर यास गाडीचे व्यवहारा संदर्भात बोलाचाली करण्याच्या कारणावरुन आरोपी क्र १ ते ५ यांनी बेकायदा गर्दी जमाव जमवुन फिर्यादी व त्यांचा मित्र कृष्णा यास वाईट वाईट शिवीगाळ करुन आरोपी क्र ५ याने मित्र कृष्णा याच्या पाठीत सिमेंट ब्लॉक मारुन व आरोपी क ३ याने फिर्यादी यांना लोखंडी रॉडने डोक्यात मारुन गंभीर जखमी केले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि भालेराव ९०६७०२३९४४ |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिंचवड ५६४/२०२३भा.दं.वि कलम ३२४,३२३,५०४,३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१२/११/२०२३ रोजी १९/३० वा. चे सुमारास जयवंत माध्यमिक विदयालय भोईरनगर चिंचवड |
| गुन्हा दाखल | :- | दि.१५/११/२०२३ रोजी १९.३० वा |
| फिर्यादी | :- | सुदर्शनदत्ता सुर्यवंशी, वय २४वर्षे, व्यवसाय - मजुरी, रा.दळवीनगर, झोपडपटटी चिंचवड पुणे |
| आरोपी | :- | १)गौरव ज्योतीराम जोगदंड वय २० वर्षे २) कुणाल बाळु कांबळे वय १९ वर्षे दोघे रा. दळवीनगर **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे उभा असताना फिर्यादीचे शेजारी राहणारे आरोपी क्र २ याने माझ्या आईशी का बोलतो या कारणा वरुन सिमेंटच्या गटटुने फिर्यादीचे डाव्या हाताच्या दंडावर मारले तसेच आरोपी क्र १ यांने माझ्या मामीशी बोलायचे नाही असे म्हणुन सिमेंटच्या ब्लॉकने फिर्यादीचे डोक्यात मारुन मला इच्छा पुर्वक दुखापत केली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | श्रेणीपोउपनि ठोंगिरे ९५११९२०८१२ |

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | देहुरोड ६१६/२०२३ भादवि २७९, ३०४(अ), ४२७,मो वा का कलम १८४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०७/११/२०२३ रोजी २२.५५ वा.चे सुमारास इंद्रप्रभा सोसायटीची मागील बाजू के व्हीले टाऊनशिपच्या बाजूचा रस्ता विकासनगर, देहुरोड पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.१५/११/२०२३ रोजी १९/३७ वा |
| फिर्यादी | :- | महेश विठ्ठल चव्हाण, वय ४५ वर्षे, धंदा नोकरी, रा. रुद्राक्ष होम्स, ए बिल्डींग, फ्लॅट क्र. ३०४, किवळेगांव, देहुरोड, पुणे मोबाईल क्र. ८३२९६९७५६९ |
| आरोपी | :- | अतुल अरुण नलावडे वय ३५ वर्षे रा. के व्हीले सोसायटी फलॅट नं. ४०६ किवळे देहुरोड पुणे **आरोपी अटक नाही** |

| | | |
|---|---|---|
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचा मेहुणा आशितोष वसंतराव हिरे, वय २५ वर्षे, रा. रुद्राक्ष होम्स, ए बिल्डींग, फ्लॅट क्र. ३०५, किवळेगांव, देहुरोड, पुणे हा यामा एफझेड मोटार सायकल नंबर एम एच १२ एस एस ४५५६ हिच्या वरुन किवळेगांवाकडे येत असताना त्याचे मोटार सायकला सदर ठिकाणी हिरो स्प्लेंडर मोटार सायकल नंबर एम एच १४ डी डब्ल्यू १२१३ हिच्या वरील चालक आरोपी याने समोरुन धडक देवून गंभीर जखमी करुन फिर्यादीचे मेहूण्याचे मृत्युस कारणी भूत ठरला आहे. तसेच फिर्यादीचे मेहुण्याचे मोटार सायकलचे नुकसान केले म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा चव्हाण ७९७२३१३७०२ |

०६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | भोसरी ८९३/२०२३ भा.दं.वि कलम ४२०,४०६ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१५/११/२०२३ रोजी ०९/१५ वा.चे सुमारास पायी चालत ॲमॅको एजन्सी शॉप जवळ जुना मुंबई पुणे हायवे रोड दापोडी |
| गुन्हा दाखल | :- | दि.१५/११/२०२३ रोजी १४.०७ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | एक दुचाकी चालक त्याने अंगात काळा कोट, काळी पॅन्ट, तोंडाला मास्क लावलेला होता **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादीहे पायी चालत आले असता नमुद आरोपी हा दुचाकीवरून फिर्यादी जवळ येवुन पुढे वयस्कर म्हतारीवरती वार झाला असुनतिचे सर्व सोने लुटून नेले. तुमच्या गळयातील सोन्याची चैन काढुन ठेवा असे सांगुन फिर्यादीचा विश्वास संपादन करून फिर्यादीने गळयातील सोन्याची चैन आरोपीचे हातात दिली असता आरोपीने हात चलाखीने सोन्याची चैन फिर्यादीचे कॅरीबॅग मध्ये ठेवल्याचे सांगुन फिर्यादीची ३०,०००/- रु किं ची दिड तोळयाची सोन्याची चैन घेवुन पळुन जावुन फिर्यादीची फसवुणक केली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि घाडगे ८६५२५२३९७२ |